**माहितीच्या अधिकारासंदर्भात अर्जदारांशी केल्या जाणाऱ्या पत्रव्यवहारावर कार्यालयाचा दूरध्वनी क्रमांक, फॅक्स क्रमांक व ई-मेल आयडी इत्यादी नमूद करण्याबाबत.**

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक क्र. केंमाअ-२००८/८७०/प्र.क्र.३००/०८/सहा,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १३/५/२००९.

**परिपत्रक :-**

माहिती अधिकारासंदर्भात अर्जदारांशी केल्या जाणाऱ्या पत्रव्यवहारावर कार्यालयाचा / जन माहिती अधिकाऱ्यांचा पूर्ण पत्ता / दूरध्वनी क्रमांक / उपलब्ध असल्यास, फॅक्स क्रमांक / ई-मेल आयडी इत्यादी बाबी नमूद केलेल्या नसल्याने अर्जदारांना अनेक अडचणी उद्भवतात, असे निदर्शनास आले आहे. त्यामुळे सर्व सार्वजनिक प्राधिकरणांनी माहितीचा अधिकार व इतरही सर्वसाधारण बाबींसंदर्भात केल्या जाणाऱ्या पत्रव्यवहारावर संबंधित कार्यालयाचा / जन माहिती अधिकाऱ्यांचा पूर्ण पत्ता/ दूरध्वनी क्रमांक / ई-मेल आयडी इत्यादी बाबी नमूद करण्याची दक्षता घ्यावी, जेणेकरून अर्जदारांना संबंधितांशी योग्य व जलद पद्धतीने संपर्क साधणे शक्य होईल, तसेच अनावश्यक पत्रव्यवहार व उपलब्ध मर्यादित संसाधनावर पडणारा ताण टाळण्याचेही, सार्वजनिक प्राधिकरणांना शक्य होईल.

माहितीच्या अधिकारासंदर्भात देय असलेले शुल्क रोख रकमेच्या स्वरूपात / बँकेचा धनादेश किंवा मनीऑर्डरच्या स्वरूपात भरण्याबाबत अर्जदारांना सूचना देणाऱ्या पत्रव्यवहारामध्ये सदर रक्कम अथवा मनीऑर्डर कोणाच्या नावे पाठवावी, चलनाद्वारे रक्कम भरावयाची असल्यास बँकेचा तपशील व लेखाशीर्ष याचाही स्पष्ट उल्लेख सर्व सार्वजनिक प्राधिकरणांनी त्यांच्या पत्रव्यवहारामध्ये करण्याची दक्षता घ्यावी, या व्यतिरिक्त पत्रव्यवहारातील भाषा सौजन्यपूर्वक तसेच अर्जदारांना मार्गदर्शक ठरेल, अशीच ठेवण्याच्या अध्याहृत तत्त्वाचीही काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**स्वाक्षरी/-**
**नं. म. शिंदे**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**